प्रेस नोट

महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक ५/७/२३

**विषय: कर आकारणी व कर संकलन कार्यालय, पुणे महानगरपालिकेकडून नागरिकांसाठी वॉररूम. whats app no.8308059999**

पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात नव्याने अस्तित्वात येणाऱ्या निवासी, बिगर निवासी, मोकळ्या जागा इत्यादी मिळकती तसेच वापरात बदल होणाऱ्या मिळकतींची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी नुसार त्या-त्या वर्षाच्या प्रचलित दरसूची नुसार आकारणी करून संबंधित मिळकतींची वार्षिक करपात्र रक्कम निश्चित करण्यात येते.

पुणे शहरामध्ये निवासी मिळकतीमध्ये मोठ्या प्रमाणात अनधिकृत हॉटेल व्यवसाय सुरु आहेत. निवासी मिळकतीमध्ये बांधकाम विभागाची कोणतीही परवानगी न घेता, वापरात बदल करून, अनधिकृत हॉटेल, रेस्टॉरंट, बार, खानावळ इत्यादी व्यवसाय सुरु असून, रात्री उशिरा ते पहाटे पर्यंत सुरु असतात त्यामध्ये कर्णकर्कश आवाजात music system सुरु असल्याने, निवासी भागातील शांतता भंग होत आहे. तसेच या ठिकाणी येणाऱ्या नागरिकांकडून अनेक वाहने रस्त्यावर पार्क केली जात असल्यामुळे पार्किंगचा तसेच वाहतुकीचा प्रश्न निर्माण होत आहे, याबाबत दैनिक वृत्तपत्रात बातम्या छापून येत आहेत. तसेच काही लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था यांनी देखील खात्याकडे याबाबत तक्रारी केल्या आहेत.

वरील नमूद सर्व गोष्टी हॉटेल, पब, रेस्टॉरंटमध्ये अनधिकृतपणे सर्रास सुरु असल्याने या सर्व गोष्टींना चाप बसावा तसेच सदर निवासी मिळकती मध्ये बिगर निवारी व्यवसाय करून पुणे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी कर आकारणी व कर संकलन कार्यालय, पुणे महानगरपालिकेमार्फत शहरातील नागरीकाकरिता एक वॉररूम तयार करण्यात आली आहे. यामध्ये गृह निर्माण संकुलांमध्ये निवासी सदनिके व्यतिरिक्त कार्यालयीन वापर, व्यावसायिक वापर, उदा ऑफिस, ब्युटीपार्लर, क्लिनिक अथवा निवासी मिळकतीमध्ये अनधिकृत हॉटेलचा वापर सुरु असल्यास अथवा एखाद्या मिळकतीची कर आकारणी केली नसल्यास, अशा मिळकतींची माहिती whats app no. 8308059999 या क्रमांकावर कळविणे बाबत नागरिकांना आव्हान करण्यात येत आहे.

अशा मिळकतींचा पत्ता व location पुणे महानगरपालिकेच्या उपरोक्त whats app क्रमांवर कळविल्यास, त्याची दखल कर आकारणी व कर संकलन विभागाकडून घेण्यात येईल.

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner